# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM)

भारत सरकारने दिनांक १२ एप्रिल २००५ रोजी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) राबविण्यास सुरुवात केली. ग्रामीण भागातील गरीब महिला आणि मुलांपर्यंत गुणवत्तापुर्ण, अद्यावत व परिणामकारक आरोग्य सेवा पुरेशा प्रमाणात पोहोचविणे हे या मिशनचे ध्येय आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान हा सात वर्षामध्ये राबवला जाणारा कार्यक्रम आहे. या विशिष्ट कालमर्यादेत अभियानात गाठलेल्या उद्दिष्टांचा प्रगती अहवाल सरकारव्दारे जाहीर केला जाईल.

**उद्दिष्टे :-**

- अर्भकमृत्यु दर आणि माता मृत्यू दर कमी करणे
- सार्वजिनक स्वच्छता, पोषण आहार, पाणी पुरवठा यासारख्या मुलभूत सेवांसोबत सार्वजनिक आरोग्य सेवा सर्वाना सुलभतेने उपलब्ध करुन देणे.
- स्थानिक साथरोग नियंत्रणाबरोबरच इतर संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचा प्रतिबंध आणि नियंत्रण करणे.
- सर्व लोकांना प्राथमिक आरोग्य सेवा मिळणेबाबत उपाय योजना आखणे एकुण जननदर कमी करणे.

**उद्दिष्टे गाठण्यासठी अभियानांतर्गत अवलंबिलेली काही प्रमुख धोरणे :-**

- आरोग्य सेवेअंतर्गत होणारा एकुण खर्च जी.डी.पी. च्या साध्याच्या ०.९ टक्के वरुन २ ते ३ टक्के पर्यंत वाढविणे.
- सार्वजनिक आरोग्य सेवांचे पालकत्व, नियंत्रण व व्यवस्थापन स्थानिक संस्थांकडून व्हावे यासाठी पंचायत प्रतिनिधीचे प्रशिक्षण घेऊन त्यांना याविषयी अवगत करणे.
- प्रयेक गावामध्ये महिला आरोग्य कार्यकर्ती आशा ची निवड करणे.
- ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता पाणी पुरवठा समितीच्या माध्यमातुन प्रत्येक गावात ग्राम आरोग्य योजने बनविणे.
- उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयातील सेवांचा दर्जा सुधारणे ( .)
- स्थानिक पातळीवर ग्राम आरोग्य नियोजन आराखडा बनविणे व त्याची अमलबजावणी करणे.
- सार्वजनिक आरोग्य सेवेमध्ये स्थानिक पारंपारीत उपचार पध्दती आयुष (आवुर्वेद योग, निसर्ग उपचार, युनानी, सिध्द, होमीओपॅथी) यांचा समावेश करणे.
- विविध समांतर (व्हर्टीकल) आरोग्य आणि कुटूंब कल्याण कार्यक्रमांना राष्ट्रीय, राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर एकात्मीक रुप देणे.

**साधावयाची ध्येये :-**

- राज्य आरोग्य अभियान पूर्णपणे कार्यरत असावे(नियमक मंडळाच्या बैठका नियमित पणे घेतल्या जावे)
- सर्व जिल्ह्यामध्ये जिल्हा आरोग्य अभियान पुर्णपणे कार्यरत असावे
- सर्व उपकेंद्रांना ए.एन.एम. असावी व सर्व उपकेंद्र कार्यरत असावी.
- २४ ७ च्या प्राथमिक आरोग्य केंद्रात ३ नर्सेस असाव्यात.
- सर्व ग्रामीण रुग्णालय ही प्राथमिक संदर्भसेवा केंद्रे म्हणुन कार्यरत व्हावी.
- सर्व स्तरावरील रुग्ण कल्याण समित्या कार्यरत झालेल्या असाव्यात
- आयुष औषधपचार प्रणाली ही शासकिय आरोग्य यंत्रणेमार्फत मुख्य प्रवाहत असावी.
- सर्व आदिवासी भागांमध्ये आशा कार्यरत व्हावी.
- जननी सुरक्षा योजनेचा लाभ १०० % लाभार्थींना मिळावा.
- निवड झालेल्या जिल्हयमध्ये एकात्मीक नवजात अर्भक व बालकांच्या आजाराचे व्यवस्थापनावर आधारीत आरोग्य सेवा देण्यात यावयात.
- राज्यांच्या अर्थसंकल्पात आरोग्य विभागास वाढीव निधी उपलब्ध व्हावा.
- सर्व पंचायत राज संस्था व रुग्ण कल्याण समितीच्या सदस्यांचे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाबाबत प्रशिक्षण पुर्ण झालेले आसावेत.
- फिरते वैद्यकिय पथक कार्यरत झालेले असावेत.

**दुय्यम धोरण :-**

- खाजगी वैद्यकिय क्षेत्रावर योग्य नियंत्रण
- राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम अंमबजावणीत खाजगी वैद्यकिय क्षेत्रातील सहभाग वाढविणे.
- ग्रामीण भागातील आरोग सेवा ध्यानात घेवून वैद्यकिय शिक्षण पध्दतीची पुनर्रचना.
- समाजाला पुरेसे आरोग्य विमा संरक्षण उपलब्ध करुन देणे
- समाजातील आरोग्य संवर्धक रुढींना चालना देणे

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान राज्य शासनाची भुमिका :-**

- राज्य व जिल्हा स्तरावर अभियान अमलबजावणी कक्ष सुरु करणे
- लोकांच्या व आरोग्य सेवांच्या गरजा ध्यानात घेवून नियोजन करणे
- पंचायत राज संस्थांना अधीक प्रशासकिय अधिकार देणे.
- अभियान अमलबजावणीसाठी वेळेवर व पुरसे अनुदान उपलब्ध करुन देणे-

**पंचायत राज संस्थांची भुमिका**

या अभियान अमलबजावणीत पंचायत राज संस्थांची भुमिका अत्यंत महत्वाची राहणार आहे. त्यांना अधिकार दिले जाणार आहेत. त्यामुळे आरोग्य व्यवस्थापन अधिक विकेंद्रीत होईल. आर्थिक तरतुदीचा विनीयोगही पंचायत राज सस्थां या स्तरवर होईल.

**अभियानातील ठळक बाबी**

- राज्य व जिल्हा आरोग्य समित्यांची स्थापना
- विविध स्तरावरील समित्यांची एकत्रीकरण
- प्रत्येक पातळीवर कृती योजना तयार करणे
- उद्दिष्ट निश्चित करणे व त्यानुसार अनुदान वाटप
- विविध स्तरावरील रुग्ण कल्याण समित्यांच्या स्थापना
- लसीकरण सेवांचे बळकटीकरण
- फिरते आरोग्य पथकाची स्थापना
- अंगणवाडी मध्ये दर महा आरोग्य शिबीरे आयोजीत करणे
- दावाखान्यात प्रसूती करुन घेण्यासाठी स्त्रियांना प्रवृत्ता करणे
- प्रत्येक गावात आशा कार्यान्वींत करणे
- जननी  सुरक्षा योजना राबविणे

**संदर्भ सेवेचे बळकटीकरण**

या बरोबरच या अंतर्गत औषधांचा अतिरिक्त पुरवठाही करण्यात येत आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामध्ये मुलभूत आरोग्य सुविधा मध्ये सुधारणा करण्याबरोबरच इतर आरोग्य कार्यक्रमावरही लक्ष केंद्रीत केलेले आहे. या सर्व बाबी लक्षात घेवून या धोरणात सूसुत्रता आणण्यासाठी जिल्हा स्तरीय जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण समिती स्थापन करण्यात आली असून त्यात सुकाणू समिती व कार्यकारी समिती आहे.  तसेच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत जिल्हास्तरावर जिल्हा आरोग्य अभियान समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

**विविध आरोग्य संस्थाव्दारे मिळणा-या सेवा**

अ) उपकेंद्र
माता आणि बालकांचे आरोग्य :-

अ) प्रसूतीपूर्व काळजी :-
सर्व गरोदर स्त्रीयांची नोंदणी ( १२ आठवडयांचे आत)

गरोदरपणात कमीत कमी पाच वेळा तपासणी :- पहिली तपासणी गरोदरपणाची शक्यता वाटल्याबरोबत, दुसरी तपासणी (१२ आठवडेत) , तिसरी तपासणी ४ ते ६ महिन्यांमध्ये (२६ आठवडे), चौथी तपासणी आठव्या महिन्यामध्ये ( ३२ आठवडे) तर पाचवी तपासणी ९ व्या महिन्यामध्ये (३६ आठवडे)

संलग्न आवश्यक सेवा जसे सर्वसाधारण तपासणी, वजन, रक्तदाब, रक्तक्षयाकरिता तपासणी, पोटावरुन तपासणी, उंची,स्तनांदची तपासणी, पहिल्या तिमाहीत फोलिक ॲसिडचे सेवन, १२ आठवडयानंतर लोह, फोलिक ॲसिड गोळयाचे सेवन, धनुर्वात प्रतिबंधक लसीची मात्रा, रक्तक्षयावरील उपचार इ. (आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यिका यांच्यासाठी मार्गदर्शक सुचना)

**लसीकरण बळकटीकरण**

लसीकरण म्हणजे काय ? :-

लसीकरणामुळे धनुर्वात, घाटसर्प, डांग्या खोकला, क्षयरोग, गोवर, पोलीओ, हेपटायटिस - बी, जापानीज मेंदुदाह इत्यादी आजारांपासून संरक्षण मिळते व पर्यायाने मुल आरोग्य दृष्टया सुदृढ राहते.

लसीकरणामुळे बालकांच्या शरीरात विशिष्ट रोगाविरुध्द लढण्याची प्रतिकार शक्ती निर्माण होते. लसीकरणानंतर एखाद्या रोगाच्या जंतूचा शरीरात प्रवेश होऊन देखील तो विशिष्ट रोग बालकास होत नाही.

विविध रोगांपासून बाळाचे सरंक्षण करण्यासाठी लसीकरणाच्या वेळापत्रकाप्रमाणे लस देणे आवश्यक आहे.

लसीकरण सत्र :-

- लसीकरणाचे सत्र - लसीकरणाचे सत्र प्रत्येक गावांत, प्रत्येक वस्तीत, अंगणवाडीत निश्चित दिवशी, निश्चित ठिकाणी व निश्चित वेळी घेतली जातात.
- लसीकरण सत्राची पुर्व कल्पना आपल्या वस्तीमधील लोकांना देण्यात येते, त्यावेळी पात्र लाभार्थीस लसीकरणाच्या ठिकाणी कुटूंबातील जबाबदार व्यक्तीने घेऊन जावे.
- लसीकरण सत्रावेळी कोणती लस दिली ? त्यांचे कायदे, लस देण्याचा हेतु लस टोचणीनतर घ्यावयाची काळजी, लसीकरणामुळे होणारा संभाव्य त्रास इ. माहिती आरोग्य कर्मचा-यांकडून समजावून घ्यावी व इतरांनाही द्यावी.